
Peer Reviewed Refereed and
UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL
MULTIDISCIPLINARY
QUARTERLY
RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - IX, Issue - IV,
October - December – 2020
English Part - II / Marathi

Impact Factor / Indexing
2019 - 6.399
www.sjifactor.com



Ajanta Prakashan

Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani

ISSN 2277 - 5730

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - IX Issue - IV

OCTOBER - DECEMBER - 2020

ENGLISH PART - II / MARATHI

Peer Reviewed Refereed and UGC Listed Journal

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2019 - 6.399
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖

Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

Late R... Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani

The information and views expressed and the research content published in this journal, the sole responsibility lies entirely with the author(s) and does not reflect the official opinion of the Editorial Board, Advisory Committee and the Editor in Chief of the Journal "AJANTA". Owner, printer & publisher Vinay S. Hatole has printed this journal at Ajanta Computer and Printers, Jaisingpura, University Gate, Aurangabad, also Published the same at Aurangabad.

**Printed by**

Ajanta Computer, Near University Gate, Jaisingpura, Aurangabad. (M.S.)

**Printed by**

Ajanta Computer, Near University Gate, Jaisingpura, Aurangabad. (M.S.)
Cell No. : 9579260877, 9822620877, 7030308239 Ph. No. : (0240) 2400877
E-mail : ajanta5050@gmail.com, www.ajantaprakashan.com

**AJANTA - ISSN 2277 - 5730 - Impact Factor - 6.399** (www.sjifactor.com)

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

# CONTENTS OF MARATHI


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | कोविड १९ : भारतीय शिक्षण व्यवस्था<br>**प्रा. डॉ. आंधळे बी. व्ही.** | १-४ |
| २ | हिंगोली जिल्ह्यातील तालुकानिहाय ज्वारी पिकाच्या उत्पादकतेचा चिकित्सक अभ्यास<br>**प्रा. डॉ. भगवान प्रभाकरराव शेंडगे** | ५-१२ |
| ३ | कोविड-१९ च्या काळात तंत्रज्ञानामुळे पारंपारिक शिक्षण पद्धतीवर होत आलेला बदल<br>**प्रा. इंद्रजित नितीनराव बंगाळे** | १३-१७ |
| ४ | कोविड - १९ मुळे विस्कळीत झालेली भारताची आर्थिक स्थिती मूळ पदावर आणण्यासाठी व जनजागृती करण्याकरीता प्रसार माध्यमांद्वारे जाहिरातींचा सकारात्मक वापर<br>**प्रा. कृष्णा गणपत सावंत** | १८-२२ |
| ५ | कोविड -१९ विषाणूचा नागरी समुदायातील रोजगारावर झालेल्या परिणामांचे एक अध्ययन<br>**प्रा. डॉ. मारोती मोतीराम बामणे** | २३-२६ |
| ६ | प्राथमिक ते उच्च शिक्षणावर कोविड - १९ चा परिणाम<br>**श्री. कनवाडे प्रवेश श्रीकांत**<br>**डॉ. मोरे केशव रामभाऊ** | २७-३१ |
| ७ | प्राथमिक ते उच्च शिक्षणावर कोविड-१९ चा परिणाम व शिक्षणासाठी डिजिटल माध्यमाचा उपयोग<br>**रामचंद्र नारायण चौरे**<br>**प्रा. डॉ. शिरिष अंबेकर** | ३२-३५ |
| ८ | ई लर्निंग आणि अध्यापनशास्त्र<br>**डॉ. रावसाहेब केराप्पा शेळके** | ३६-४० |
| ९ | ऑनलाईन शिक्षणाचे फायदे तोटे<br>**डॉ. देवकर-गोडसे मंदाकिनी विकास** | ४१-४३ |
| १० | कोरोना विषाणू आणि शिक्षण<br>**श्री. गोडसे विकास पंढरीनाथ** | ४४-४६ |
| ११ | कोरानाचे संकट आणि स्थलांतरित मजूरांपुढील आव्हाने<br>**प्रा. अन्सारी एस. जी.** | ४७-५० |
| १२ | कोविड-१९ चा शिक्षणावर होणारा परिणाम<br>**Dr. Shakuntala Mitharam Bharambe** | ५१-५४ |
| १३ | कोरोनाचा सामाजिक जीवनावर झालेल्या परिणामाचा समाजशास्त्रीय अभ्यास<br>**प्रा. डॉ. सुनंदा विश्वनाथ भद्रशेटे** | ५५-५७ |

VOLUME - IX, ISSUE - IV - OCTOBER - DECEMBER - 2020
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)

# १. कोविड १९ : भारतीय शिक्षण व्यवस्था

**प्रा. डॉ. आंधळे बी. व्ही.**
राज्यशास्त्र विभाग, कै. रमेश वरपुडकर महाविद्यालय, सोनपेठ जि. परभणी.

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

**प्रस्तावना**

१७ नोव्हेंबर २०१९ रोजी चीनच्या वुहान शहरात कोरोनाचा पहिला ऋग्ण सापडला. याला आज एक वर्ष होत आहे. जागतिक आरोग्य संघटनेने कोरोनाला जागतिक महामारी म्हणून जाहीर केले आहे. जगातली जवळपास १९० पेक्षा अधिक देशात कोरोनाची साथ पसरली. यामुळे जगतील सर्व व्यवहार ठप्प झाले. अनेक देशांमध्ये लॉकडाऊन जाहीर करून आवाजाहीवर निर्बंध घातले.कारण की, कोरोना हा संसर्गजन्य आजार आहे. कोरोनाग्रस्त ऋग्णाच्या संपर्कात निरोगी व्यक्ती आली की त्याला हा आजार होतो. यामुळे व्यक्ती संपर्क कमी केला तरच हा आजार फैलावण्याला आपण अटकाव करू शकतो.कोरोना संसर्गापासून वाचण्यासाठी मास्कचा वापर करणे, सामाजिक दुरी राखणे व सॅनिटायझरचा वापर करणे यासारखे उपाय करणे आवश्यक आहेत. कोरोनाच्या या जागतिक महामारीने संपूर्ण जग परेशान आहे. सामाजिक, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक, राजकीय आणि शैक्षणिक व्यवस्था कोरोनाच्या काळात कोलमडून पडल्या आहेत.यातून बाहेर पडण्यासाठी सर्व स्तरावर प्रयत्न केले जात आहेत. अनेक देश कोरोनावर प्रतिबंधात्मक लस शोधत आहेत. परंतु अजून तरी यात यश आले नाही.जोपर्यंत कोरोनावर उपचार करणारी प्रभावी लस तयार होत नाही तोपर्यंत जगातील सर्व व्यवहार संथपणेच सुरू ठेवावे लागतील.सध्या जगात ५ कोटीपेक्षा अधिक कोरोनाची लागणं झालेले लोक आहेत. यात १३ लाखापेक्षा अधिक मृत्युमुखी पडले. भारतात ८८ लाखापेक्षा अधिक लोकांना कोरोनाची बाधा झाली तर १ लाख ३० हजारापेक्षा अधिक मृत्युमुखी पडले. एकुण कोरोनाच्या साथीने जिवित व वित्त हानी मोठ्या प्रमाणात झाली आहे.

आज युरोपातील काही देशांनी दुसर्या टप्प्यातील लॉकडाऊनची घोषणा केली आहे. कोरोनाच्या या दुसर्या लाटेत त्याचे काय परिणाम होतील हे येणारा काळच सांगेल. सध्याच्या परिस्थितीत कोरोना प्रतिकार शक्ती कमी असणार्या लोकांच्या बाबतीत घातक ठरत आहे. त्यामुळे आजही पुर्णपणे क्षमतेने सर्व व्यवहार सुरू झाले नाहीत. भारतात आजही शाळा, कॉलेज बंद आहेत. समाज व्यवस्थेच्या इतर क्षेत्राप्रमाणेच शिक्षण क्षेत्रावर फार मोठे परिणाम झाले आहेत. एकुण या एक वर्षाच्या कोरोना काळात भारतीय शिक्षण क्षेत्रावर काय परिणाम झाले आहेत हे आपणाला पुढील काही बाबीवरून सांगता येईल.

**भारतीय शिक्षण व्यवस्था**

भारतीय स्वातंत्र्यानंतर भारताचे शिक्षण विषयक स्वतंत्र धोरण सुरू झाले. शिक्षण क्षेत्रात देशाला पुढे नेण्यासाठी सर्वपल्लीराधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली आयोग नेमण्यात आला. जो राधाकृष्ण आयोग

VOLUME - IX, ISSUE - IV - OCTOBER - DECEMBER - 2020
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)

(१९४८-४९)म्हणून ओळखला जातो. त्यानंतर मुदालियर आयोग (१९५३),विश्वविद्यालय अनुदान आयोग (१९५३),कोठारी शिक्षण आयोग (१९६४),राष्ट्रीय शिक्षण धोरण (१९६८),नवीन शिक्षण धोरण (१९८६)आणि आताचे राष्ट्रीय शिक्षण धोरण (२०१९) या प्रमाणे विकसित होत गेले आहे. यात प्राथमिक शिक्षण, माध्यमिक शिक्षण व उच्च शिक्षण अशी विभागणी करण्यात आली आहे. शिक्षण हे सक्तीचे व मोफत असले पाहिजे असे पुर्वीपासूनची मागणी आहे. पण अजून तरी भारतात शिक्षणाचे खर्या अर्थाने सार्वत्रिकरण झाले नाही. आजही राष्ट्रीय उत्पन्नाच्या २.७% येवढाच खर्च केला जातो. यामुळे आजही सर्वसामान्य भारतीय नागरिकाला शिक्षण सहजपणे उपलब्ध होत नाही. आजही शिक्षणाच्या बाबतीत समाजात विषमता आहे. शहरी ग्रामीण, स्त्री पुरुष, गरीब श्रीमंत व सुशिक्षित निरक्षर असे भेद आहेत.

सन २००९ च्या शिक्षण कायद्याने ६ ते १४ वर्षापर्यंतच्या मुलांना निःशुल्क व अनिवार्य शिक्षणाचा अधिकार दिला आहे. १०+२+३ हा शिक्षणाचा आराखडा स्वीकारला आहे. आज देशात ७०० विश्वविद्यालय, ४० हजार महाविद्यालय व माध्यमिक व प्राथमिक शाळा आहेत. १९९० च्या दशकानंतर भारतीय शिक्षण व्यवस्थेत मोठे बदल झाले आहेत. संख्यात्मक बदलाबरोबरच गुणात्मक बदल झाले आहेत. शिक्षणाच्या बाजारिकरणापासून ते डिजिटलाझेशनपर्यंत शिक्षण व्यवस्थेचा प्रवास सुरू आहे. सर्वांसाठी शिक्षण आवश्यक असले तरी आजही भारतात शिक्षित अशिक्षीतातील दरी मोठी आहे. शिक्षणाच्या अपुर्या सुविधा व उघड्यावर शाळा आजही भारतात पाहायला मिळतात. एकीकडे ई- पाठशाळा,स्मार्ट क्लासरूम,सिबिएसई पॅटर्न सारख्या शिक्षण व्यवस्था पुरविणार्या शाळा तर दुसरीकडे वाडी तांड्यावर झाडाखाली फळा पाटी नसणार्या एक शिक्षकी शाळा. ही तफावत लक्षात घेता भारतीय शिक्षण व्यवस्थेत किती बदल करावे लागतील हा एक प्रश्नच आहे. एका विषम आर्थिक परिस्थितीत भारतीय शिक्षण व्यवस्था अडकलेली आहे. ११ सप्टेंबर २०२० रोजी भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नवीन शिक्षण धोरण जाहीर केले आहे. चौतीस वर्षाच्या विलंबानंतर हे शिक्षण धोरण जाहीर झाले आहे. त्याची अमंलबजावणी होण्यासाठी अजून किती वेळ लागेल हे सांगता येत नाही. या नवीन शिक्षण धोरणात 'रिड टू लर्न' ऐवजी 'लर्न टू रिड' वर भर देण्यात आला आहे. तसेच यात ५+३+३+४ चे मॉडेल स्वीकारण्यात आले आहे. नवीन धोरणात राष्ट्रीय उत्पन्नाच्या ६% पैसा खर्च करण्याचा मनोदय व्यक्त केला आहे. मातृभाषा व स्थानिक भाषेतून शिक्षण देण्यावर भर दिला आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून कौशल्य प्राप्त पिढी घडविणे हे या शिक्षण धोरणाचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

**कोरोना आणि शिक्षण**

कोरोनाने इतर व्यवस्था प्रमाणेच शिक्षण व्यवस्था उध्वस्त केली आहे. केजी टू पीजी पर्यंतचे सर्व औपचारिक शिक्षण आज बंद आहे. एप्रिल २०२० च्या युनेस्कोच्या एका अहवानानुसार १८८ देशातील १५१ कोटी विद्यार्थी घरी आहेत. भारतात हेच १५ लाख शाळा मधून शिकणारे २६ कोटी विद्यार्थी व ८९लाख शिक्षक घरात राहून शिक्षण घेत आहेत. परिक्षा रद्द करणे, परिक्षा पुढे ढकलणे व परिक्षा न घे

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta. Sonpeth

विद्यार्थ्यांना पुढच्या वर्गात प्रवेश देणे हे आज कोरोनाचा शिक्षण व्यवस्थेवरिल सर्वात मोठे परिणाम आहेत. आहेत. कोरोना महामारीने क्लासरूम शिक्षण व्यवस्था (Class room Education system) नष्ट केली आणि प्रत्यक्ष संवाद पध्दती (Direct Dialogue Type) वर आघात केले आहेत. शिक्षणाच्या गतीला कुंठीत करण्याचे कार्य कोरोनाने केले आहे. यामुळे अनेकांच्या मनात भीती, घबराट व व्याकुळता निर्माण झाली आहे. Learn from Home (घरून शिक्षण) व्यवस्था आपले पाय रोवत आहे. कोरोनाच्या या एकुण परिस्थितीत शिक्षण चालू राहिले पाहिजे. मग ते ऑनलाईन असो किंवा ऑफलाईन.

**ऑनलाईन शिक्षण**

कोरोना काळात भारतीय शिक्षण व्यवस्था ऑनलाईन पध्दतीने सुरू आहे. याचे चांगले वाईट परिणाम समाजावर होत आहेत. ऑनलाईन शिक्षण घेण्यासाठी सर्वात महत्वाच्या दोन गोष्टी असणे आवश्यक आहे. त्यांत एक म्हणजे इंटरनेट व दुसरे म्हणजे संगणक किंवा तत्सम साधने. सन २०२० च्या ट्रायच्या अहवालानुसार भारतात इंटरनेट वापरणांरांची संख्या ६८.४५ कोटी एवढी आहे. यात मोबाईल फोनचा वापर करणारे ४८.८२ कोटी लोक आहेत तर इंटरनेटसह स्मार्ट फोन वापरणारे ४०.७२ कोटी व टीव्ही वापरणारे ७६ कोटी लोक आहेत. एकुण भारतात माहिती तंत्रज्ञानाचा वापर मोठ्या प्रमाणात वाढला आहे .जवळपास ५२% लोक आज इंटरनेटचा वापर करत आहेत. यात शहरी भागातून ६४% तर ग्रामीण भागात ३६% लोक आज इंटरनेट वापरत आहेत. इंटरनेटचा वापर करण्यात ६७% पुरुष तर ३८% स्त्रीया आहेत. यासर्व आकडेवारीवर विचार केला तर भारतातील निम्मी लोकसंख्या ऑनलाईन शिक्षण घेण्यासाठी लागणार्या साधना पासून दुर आहे. याशिवाय ऑनलाईन शिक्षण घेण्यासाठी Google meet, Zoom, Cisco webex, Microsoft Teams सारखे अॅप वापरणे व ती वापरण्याचे तांत्रिक कौशल्य माणसाकडे असणे आवश्यक आहे.

भारताच्या संदर्भात ऑनलाईन शिक्षण व्यवस्थेचा विचार केला असता असे दिसून येते की, गेल्या काही दिवसांपासून शासनाने ऑनलाईन शिक्षण व्यवस्था चालविण्यावर भर दिला आहे. यामुळे कोरोना काळात थांबलेले शिक्षण पुन्हा सुरू झाले आहे. यात अनेक अडीअडचणी आहेत. पण या संकटाच्या काळात देशाच्या कानाकोपर्यात ऑनलाईनच्या माध्यमातून शिक्षण सुरू आहे.

**समारोप**

भारतीय शिक्षण व्यवस्था विसंगतीपुर्ण पायावर उभी आहे. भारतीय गुरुकुल शिक्षणापासून सुरू झालेला प्रवास मेकॉलेच्या शिक्षणापर्यंत झालेला आहे. यात सरकारी हस्तक्षेपाने शिक्षण व्यवस्थेवर चालविलेले चिकित्सक प्रयोग यामुळे ती अधिक तकलादु झाली आहे. अनुदानित, विना अनुदानित, कायम विना अनुदानित व बाजारधिष्ठीत आजच्या काळात शिक्षण व्यवस्था श्रीमंत वर्गाची बटीक झाली आहे. आज ऑनलाईन शिक्षण सुरु आहे. पण त्यासाठी लागणारे कौशल्य, साधने याची कमतरता जाणवत आहे. या परिस्थितीत शिक्षण व्यवस्थेपुढे अनेक आव्हाने आहेत. त्याला तितक्याच ताकदीने सामोरे जावे लागले.

नवीन तंत्रज्ञानाचा चांगला वापर करून कौशल्यपूर्ण शिक्षणावर भर द्यावा लागेल. भारतीय शि जागतिक स्पर्धेत टिकला पाहिजे. तरच भारतीय शिक्षण व्यवस्था सक्षम आहे असे म्हणता येईल. अन आजच्या कौशल्यपूर्ण व तांत्रिक जागतिक स्पर्धेत आपण मागे राहूत.

कोरोना महामारीचे परिणाम इतर क्षेत्राप्रमाणेच शिक्षण क्षेत्रावर झाले आहेत. आजही भारता शिक्षण हे ऑनलाईन पध्दतीने सुरू आहे. शिक्षण ऑनलाईन असो किंवा ऑफलाईन ते सर्वांना सम मिळाले पाहिजे, तसेच ते माहागडे झाले आहे. सर्वांना मापक दरात घेता येईल यासाठी सरकारने प्र केले पाहिजेत.

**संदर्भ सूची**


1. http://www.ifsj.in/Icons-Details/?id=5२]
2. www.eskal.com
3. www.wikipedia.com
4. www. Historydekho. Com
5. www.drishtiias.com
6. mygov.com
7. www.bbc.com


Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani